जा क्र वसंज्वा/ज्वारी/781 / २०२२
दिनांक: 10-6-2022

विषय : सन २०२२- २३ मध्ये ज्वारी संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत प्रक्षेत्रावरील करावयाचे कामे उदा. विविध प्रयोगांचे व्यवस्थापन, वाण पैदास कार्यक्रमात वेळोवेळी केली जाणारी कामे विषयान्वये विविध संशोधनात्मक प्रयोग, प्रात्याक्षिके व इतर प्रक्षेत्रावरील कामे कंत्राट पध्दतीने करण्याकरिता वैद्य परवानाधारक कंत्राटदाराकडून मजूराचे (स्त्री/पुरुष) निविदा दर (कोटेशन) बोलविण्या बाबत..

वरील विषयाच्या अनुषंगाने व वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ, ज्वारी संशोधन विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत प्रक्षेत्रावरील करावयाचे कामे उदा. वाण पैदास कार्यक्रम वेळोवेळी केली जाणारी कामे विविध प्रयोगांचे व्यवस्थापन, वाण पैदास कार्यक्रमात वेळोवेळी केली जाणारी कामे विषयान्वये विविध संशोधनात्मक प्रयोग, प्रात्याक्षिके व इतर प्रक्षेत्रावरील कामे कंत्राट पध्दतीने करण्याकरिता वैद्य परवानाधारक कंत्राटदाराकडून मजूराचे (स्त्री/पुरुष) निविदा दर (कोटेशन) बोलविण्यासाठी खालील प्रमाणे अटी व शर्तीच्या अधिन राहून मागविण्यात येत असून निविदा मसूदा सोबत जोडण्यात आलेला आहे.

| अ. क्र. | अटी व शर्ती |
|---|---|
| १. | निविदा पत्रक/कोटेशन कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी ५.३० या वेळेत स्वीकारल्या जातील. |
| २. | निविदा/कोटेशन ज्वारी संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांच्या नावाने सीलबंद लिफाफा मध्ये पाठवावी. |
| ३. | कंत्राटदाराकडे संबंधित कामाच्या वैद्य परवाना असणे बंधंनकारक आहे. कंत्राटदाराला परवाना व संबंधित इतर सर्व आवश्यक कागदपत्रे या कार्यालयास सादर करणे बंधंनकारक राहील. |
| ४. | कंत्राटदारास मिळालेल्या कामाच्या देयकाचे १० टक्के रक्कम सुरक्षा ठेव म्हणून संबंधित विभागाकडे जमा करावी लागेल व काम पर्ण झाल्यावर सुरक्षा ठेव परत मिळण्याकरिता संबंधित विभागाकडे अर्ज करावा लागेल, त्यानंतर सुरक्षा ठेव परत करण्यात येईल. |
| ५. | कंत्राट पध्दतीने प्रक्षेत्रावरील प्रयोगाचे व्यवस्थापन, प्रात्याक्षिके व्यवस्थापन व वाण पैदास कार्यक्रमा वेळोवेळी केली जाणारी कामे इत्यादी प्रक्षेत्र व्यवस्थापना संबंधित कामे करण्यासाठी वापरण्यात येणा-र स्त्री/पुरुष मजूरांच्या व्यवस्थापनाच्या संपूर्ण जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील. |
| ६. | ज्वारी संशोधन केंद्र, कार्यालयाअंतर्गत संपूर्ण प्रक्षेत्रावरील प्रयोगाचे व्यवस्थापन, प्रात्याक्षिके व्यवस्थापन व बिजोत्पादन कार्यक्रम इत्यादी कामे करत असतांना पिकाचे नुकसान झाल्यास विद्यापीठ प्रशासनाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे नुकसान भरपाई संबंधित कंत्राटदाराकडून वसूल करण्यात येईल. |
| ७. | प्रक्षेत्रावरील प्रयोगाचे व्यवस्थापन, प्रात्याक्षिके व्यवस्थापन व बिजोत्पादन कार्यक्रम इत्यादी कामे करत असतांना करते वेळी कुठलीही दुर्घटना/अपघात/जिवितहानी झाल्यास हे कार्यालय किंवा कोणताही कर्मचारी अधिकारी किंवा विद्यापीठ जबाबदार राहणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील. |
| ८. | विभागावर नेमुन देण्यात आलेले सर्व प्रक्षेत्रावरील कामे काटेकोरपणे पूर्ण करण्यात यावे. कामाबाबत विभागावरून तक्रार आल्यास किंवा काम अर्धवट राहिल्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही, विद्यापीठ प्रशासनलाने वेळोवेळी निर्देशित केलेल्या नियमांचे पालन करणे संबंधित कंत्राटदारांना बंधन कारक राहील. |
| ९. | विद्यापीठ प्रशासनाने वेळोवेळी निर्देशित केलेले नियमांचे पालन करने संबंधित कंत्राट धारकाला बंधंनकारक राहील. |
| १०. | कंत्राटदारांनी देयक सादर करते वेळी बॅंक खाते बाबतची संपूर्ण माहिती सादर करावी अन्यथा देयक अदा केले जाणार नाही. |

११. या कार्यालयात कंत्राटदारास वाण पैदास कार्यक्रमात वेळोवेळी केली जाणारी कामेव इतर संशोधनात्म प्रयोग संबंधित कामे करण्यासाठी कोणत्याही प्रकारचे साहित्य पुरविण्यात येणार नाही. बिजोत्पाद कार्यक्रम व इतर संशोधनात्मक प्रयोग संबंधित कामे करण्यासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करू देण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील.

१२. कंत्राटदारास वाण पैदास कार्यक्रमात वेळोवेळी केली जाणारी कामेव इतर संशोधनात्मक प्रयोग संबंधि कामाचे देयक काम पूर्ण व विहित वेळेत पूर्ण केल्यावर संबंधित विभागाचे प्रभारी अधिकारी यांनी का परिणामकारक झाल्याचे प्रमाणित केल्या नंतरच कामाचे देयक पारित करण्यात येईल.

१३. प्रक्षेत्रावरील वाण पैदास कार्यक्रमात वेळोवेळी केली जाणारी कामेव संशोधनात्मक प्रयोग संबंधित का करण्यासाठी वापरण्यात येण-या स्त्री/पुरुष मजूरांना कामगार कायदयानुसार किमान वेतन, वि संरक्षण, भविष्य निर्वाह निधी देणे, रोकड पध्दतीचा वापर न करता तसेच सर्व प्रकारच्या नियमाने नियमित भरना करणे ई. संपूर्ण जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील.

१४. प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम व संशोधनात्मक प्रयोग संबंधित कामे करीत असताना कोणताही वाद विवाद निर्माण झाल्यास सदर वाद विवाद विभागाचे अधिकारी/मां. संशोधन संचालक, डॉ. पंदेकृवि., अकोला यांच्या समक्ष मिटविला जाईल व अंतिम निर्णय मा. संशोधन संचालक, डॉ. पंदेकृवि., अकोला यांचा राहील आणि तो सर्वांना मान्य करणे बंधंनकारक राहील.

१५. प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम व संशोधनात्मक प्रयोग संबंधित कामे ही एक वर्षामधील खरीप, रब्बी व उन्हाळी या तिन्ही हंगामाकरिता असून कामाचे दर एका वर्षा करिता वैद्य राहील.

१६. सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे व संपूर्ण जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची असल्याचे रू. १०० चे स्टॅम्प पेपर वर करारनामा सादर करणे संबंधित कंत्राटरादाला बंधंनकारक राहील.

१७. वरील प्रमाणे अटी व शर्तीस अधिन राहून सोबत जोडलेलया निविदा मसुदा तपशीला नुसार दि. २३.०६.२०२२ रोजी पर्यत कार्यालयीन वेळेत निविदा सीलबंद लिफाफा मध्ये सादर करावी.

व.सं.शा.,
ज्वारी संशोधन विभाग

# निविदा (कोटेशन) मसुदा

ज्वारी संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम व इतर संशोधनात्मक प्रयोग व प्रयोगशाळा मधील कामे कंत्राटी पध्दतीने करण्याकरिता कुशल/अकुशल मजूरांचे (स्त्री/पुरुष) दर खालील प्रमाणे देण्यात यावे.

| अ. क्र. | कामाचा तपशील | दर (रु) | शेरा |
|---|---|---|---|
| १. | निंदन करणे/ खूरपणी करणे | | प्रक्षेत्रावरील ज्वारी पिकासंबंधि कामे व इतर |
| | अ. खरीप | प्रति हेक्टर | |
| | ब. रब्बी | प्रति हेक्टर | |
| २ | पिकाची विरळणी करणे कमी अंतरावरील | प्रति हेक्टर | |
| ३ | बियाणे टोकन करणे/पेरणी करणे (कमी अंतर) | प्रति हेक्टर | |
| ४ | पिकांना पाणी देणे मोकाट पध्दत/स्प्रिंकलर | प्रति हेक्टर | |
| ५ | पिकांची कापणी मळणी व गंजी लावणे | प्रति हेक्टर | |
| ६ | शेतातील धसकटे काडी कचरा वेचणे | प्रति हेक्टर | |
| ७ | पिकांची व कार्यालय इत्यादी संरक्षण करणे पहारेकरी (चौकीदारी) | प्रति दिन | |
| ८ | पाठीवरच्या पंपाने फवारणी करणे, साधा स्प्रे | प्रति हेक्टर | |
| ९ | कार्यालयातील परिसरातील स्वच्छता करणे, झाडांना पाणी देणे इ. | प्रति दिन | |
| १० | नांगरणी ट्रॅक्टरने दोन फाडी/तीन फाडी | प्रति हेक्टर | |
| ११ | मोगडणे पंजी वाही | प्रति हेक्टर | |
| १२ | वखरणी ट्रॅक्टरने, बैलाने (वखर मजूरासह), पट्टी पास/जाभूळवाही | प्रति हेक्टर | |
| १३ | काशा/धसकटे/कचरा/फणे वेचने | प्रति हेक्टर | |
| १४ | वरखते देणे हाताणे फेकणे/बांगडी पध्दतीने | प्रति हेक्टर | |
| १५ | पिक काढणी/ ज्वारी कापणी, कनस खुडणे, खळयावर जमा करणे | प्रति हेक्टर | |
| १६ | वळई रचणे १००० पेंडयासाठी | प्रति हेक्टर | |
| १७ | पोत्याची थप्पी लावणे (प्रति क्विंं) | प्रति क्विं. | |
| १८ | दांड तयार करणे | प्रति हेक्टर | |
| १९ | बिजोत्पादन मधील भेसळ काढणे | प्रति हेक्टर | |
| २० | शेणखत भरणे/उतरविणे/वाहतुक ५ टन | प्रति टन | |
| २१ | शेणखत पसरविणे ५ टन | प्रति टन | |
| २२ | तण नाशकाची फवारणी करणे, नॅपसॅक स्प्रे मजूराह | प्रति हेक्टर | |

निविदा सूचनेमधील संपूर्ण अटी व शर्ती मला सर्वस्वी मान्य आहेत.

ठिकाण :
दिनांक